पुढारी

# शिवाजी विद्यापीठात सीईसी उपक्रमाचे लोकार्पण

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

पदवी स्तरावरील विद्यार्थ्यांसाठी ही उपयुक्त व प्रभावी साधने असल्याचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी सांगितले. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या (यूजीसी) 'कन्सॉर्शियम ऑफ एज्युकेशनल कम्युनिकेशन' (सीईसी) या उपक्रमाचे ऑनलाईन लोकार्पण करण्यात आले, यावेळी ते बोलत होते.

विज्ञान व तंत्रज्ञान, व्यवस्थापन व व्यावसायिक, सामाजिक शास्त्रे आणि कला व संस्कृती या चार मुख्य विषयांमधील ६६ उपविषयांचे ७४० पेपरची व्याख्याने यांतर्गत उपलब्ध करण्यात आली आहेत.



बी.एस्सी., बी.ए. आणि बी.कॉम. च्या विद्यार्थ्यांसाठी ती उपयुक्त ठरणार आहेत. विविध ऑनलाईन शैक्षणिक सुविधा शिवाजी विद्यापीठाच्या पदवी स्तरावरील विद्यार्थ्यांसाठीही उपलब्ध करण्यात आल्या आहेत. त्यांचा महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा, असे आवाहन विद्यापीठाच्या बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्राच्या संचालक डॉ. नमिता खोत यांनी केले.

लोकमत

# पीएच.डी.साठी दुसऱ्या दिवशी १२०५ परीक्षार्थी

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील विविध विषयांच्या एम.फील., पीएच.डी. अभ्यासक्रमांची प्रवेश परीक्षा मंगळवारपासून सुरू झाली. याअंतर्गत दुसऱ्या दिवशी बुधवारी एकूण १२०५ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. त्यासाठी १९०४ जणांनी नोंदणी केली होती. विद्यापीठ कार्यक्षेत्रातील तीन केंद्रांवर ऑफलाइन पद्धतीने परीक्षा झाली. त्यात इलेक्ट्रॉनिक्स, बिझनेस मॅनेजमेंट, मराठी, इलेक्ट्रॉनिक्स अँण्ड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंग, कॉम्प्युटर सायन्स, रशियन लँग्वेज, अर्थशास्त्र, अॅग्रो-केमिल अँण्ड पेस्ट मॅनेजमेंट आदी विविध १६ अभ्यासक्रमांचा समावेश होता. एम.एस्सी. प्रथम वर्षाच्या २१ विद्यार्थ्यांनी ऑनलाइन परीक्षा दिली. विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाने विविध चार परीक्षांचे निकाल जाहीर केले. त्यात एम.एस्सी. (पर्यावरणशास्त्र सत्र एक आणि दोन), बी.ए., बी.एड. (सत्र तीन आणि चार) अभ्यासक्रमांचा समावेश आहे.

28 OCT 2021 पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# पदवीस्तरीय विद्यार्थ्यांसाठी 'सीईसी' च्या शैक्षणिक सुविधा

## - डॉ. नमिता खोत यांची माहिती

कोल्हापूर : प्रतिनिधी

विद्यापीठ अनुदान आयोगाच्या (यूजीसी) 'कन्सॉर्शियम ऑफ एज्युकेशनल कम्युनिकेशन' (सीईसी) या उपक्रमांतर्गत विविध ऑनलाईन शैक्षणिक सुविधा शिवाजी विद्यापीठाच्या पदवीस्तरावरील विद्यार्थ्यांसाठीही उपलब्ध करण्यात आल्या आहेत. त्यांचा महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा, असे आवाहन विद्यापीठाच्या बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्राच्या संचालक डॉ. नमिता खोत यांनी केले आहे. शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते या उपक्रमाचे नुकतेच ऑनलाईन लोकार्पण करण्यात आले असून, तो विद्यार्थ्यांना



शिवाजी विद्यापीठ

वापरण्यास खुला करण्यात आला आहे.

डॉ. खोत यांनी दिलेल्या माहितीनुसार, 'कन्सॉर्शियम ऑफ एज्युकेशनल कम्युनिकेशन' हे विद्यापीठ अनुदान आयोगाच्या आंतरविद्यापीठ केंद्रांपैकी एक प्रमुख व लोकप्रिय व्यासपीठ आहे. दूरदर्शनचे प्रभावी माध्यम, तसेच अलीकडील काळात माहिती तंत्रज्ञानाची उपलब्ध नवसाधने व मंच या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या उच्च शैक्षणिक गरजांची पूर्तता करण्यासाठी ते विकसित करण्यात आले आहे. दूरदर्शनची शैक्षणिक ज्ञानप्रसाराचे साधन म्हणून काम करण्याची क्षमता व शक्ती लक्षात घेऊन 'यूजीसी'ने १९८४ मध्ये देशव्यापी वर्ग (कंट्रीवाईड क्लासरूम) कार्यक्रम सुरू केले. या कार्यक्रमांच्या निर्मितीसाठी सहा विद्यापीठांमध्ये मीडिया केंद्रांची स्थापना करण्यात आली. त्यानंतर १९९३ मध्ये राष्ट्रीय स्तरावर अशा शैक्षणिक उत्पादनांचे समन्वयन, मार्गदर्शन आणि सुविधा प्रदान करण्यासाठी नोडल एजन्सी म्हणून 'सीईसी' उदयास आली. आज 'सीईसी' अंतर्गत २१ माध्यम केंद्रे या ध्येयपूर्तीसाठी कार्यरत आहेत.

'यूजीसी'चा 'सीईसी' हा उपक्रम अत्यंत विद्यार्थीभिमुख असून, देशातील विद्यार्थ्यांसाठी तो अतिशय उपयुक्त सिद्ध झाला आहे. म्हणूनच शिवाजी विद्यापीठाने आपल्या पदवीस्तरावरील विद्यार्थ्यांनाही उपलब्ध करून देण्याचे ठरविले. कोविडच्या कालखंडाने प्रत्यक्ष शिक्षणाबरोबरच ऑनलाईन शैक्षणिक साधने व उपक्रमांचीही गरज पटवून दिली आहे. त्यामुळे 'सीईसी'च्या व्यासपीठावरील अत्यंत उपयुक्त व प्रभावी स्टडी मटेरियल आपल्या विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देत असताना मनस्वी आनंद होतो आहे. या सुविधेचा आपले सर्वच पदवीस्तरावर शिक्षण घेत असणारे विद्यार्थी निश्चितपणे लाभ घेतील, असा विश्वास कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी व्यक्त केला आहे.

सकाळ

# वाचनाने सामाजिक संस्कृती घडते : डॉ. व्ही. एन. शिंदे

**रमण मळा :** ''वाचन ही एक कला असून, ती आत्मसात केल्याने वैयक्तिक पातळीवर वाचनाची प्रक्रिया गतिमान होते. ते वाचन सामाजिक पातळीवर पोचते. त्यामुळे सामाजिक संस्कृती घडते आणि पर्यायाने वाचन संस्कृती समृद्ध होते,'' असे मत शिवाजी विद्यापीठाचे उपकुलसचिव, विज्ञान लेखक डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी व्यक्त केले. महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई आणि महावीर महाविद्यालयातील मराठी-हिंदी विभाग आयोजित 'वाचन प्रेरणा दिन' कार्यक्रम झाला. प्रभारी प्राचार्य डॉ. भरत नाईक अध्यक्षस्थानी होते. हिंदी विभागप्रमुख डॉ. राजेंद्र रोटे उपस्थित होते. डॉ. शिंदे म्हणाले, ''माझे वडील ही माझ्या वाचनाची प्रेरणा आहे. ज्ञान समृद्धीसाठी वाचन उपयुक्त ठरते. पुस्तकांच्या सहवासातून ज्ञानाबरोबरच आनंदाची प्राप्ती होते. वाचनाने मन, बुद्धी व विचार सशक्त होतात. त्यामुळे सतत वाचत राहा. आनंदी राहा.'' विभागप्रमुख प्रा. डॉ. गोपाळ गावडे यांनी स्वागत केले. डॉ. शरद गायकवाड यांनी परिचय करून दिला. डॉ. प्रकाश कांबळे यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. रविदास पाडवी यांनी आभार मानले. प्रा. डॉ. गोमटेश्वर पाटील, प्रा. जयवंत दळवी यांनी संयोजन केले.

2 8 OCT 2021

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ‘सीईसी’च्या सुविधा पदवीस्तरीय विद्यार्थ्यांसाठीही

## डॉ. नमिता खोत; विद्यापीठात कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या हस्ते ऑनलाईन लोकार्पण

**टेंबलाईवाडी, ता. २७ :** विद्यापीठ अनुदान आयोगाच्या ‘कन्सॉर्शियम ऑफ एज्युकेशनल कम्युनिकेशन’ (सीईसी) उपक्रमांतर्गत विविध ऑनलाईन शैक्षणिक सुविधा शिवाजी विद्यापीठाच्या पदवीस्तरावरील विद्यार्थ्यांसाठीही उपलब्ध केल्या आहेत. त्यांचा महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा, असे आवाहन बॅरिस्टर बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्राच्या संचालक डॉ. नमिता खोत यांनी केले. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते उपक्रमाचे ऑनलाईन



लोकार्पण झाले. तो विद्यार्थ्यांना वापरण्यास खुला केला आहे.

डॉ. खोत म्हणाल्या, की ‘सीईसी’ने तयार केलेल्या पदवी स्तरावरील अभ्यासक्रमांसाठीचे स्टडी मटेरियल तसेच ई-कन्टेन्ट विद्यार्थ्यांना लाभ

> **‘सीईसी’च्या व्यासपीठावरील उपयुक्त स्टडी मटेरियल विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देत असताना आनंद होतो आहे. या सुविधेचा आपले सर्वच पदवी स्तरावर शिक्षण घेत असणारे विद्यार्थी निश्चितपणे लाभ घेतील.**
> **- डॉ. डी. टी. शिर्के, कुलगुरू**

व्हावा, यासाठी शिवाजी विद्यापीठाने त्यांच्याबरोबर सामंजस्य करार केला. या कराराअंतर्गत ‘सीईसी’चे स्टडी मटेरियल पदवी स्तरावर शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना उपलब्ध केले आहे. बॅरिस्टर बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्राच्या e-contents for Under Graduate Students या वेबपेजवर ‘सीईसी’च्या http://cen.in/cec/curriculum_class या लिंकवरील ई-कन्टेन्ट व्हिडिओसह उपलब्ध केले आहेत.

### कोणते अभ्यासक्रम उपलब्ध?

लिंकमधील मॉड्यूलमध्ये चार विभाग (क्वाड्रंट) आहेत. पहिल्या विभागात लिखित (टेक्स्ट) स्वरूपातील संसाधने आहेत. दुसऱ्या विभागात ऑडिओ-व्हिज्युअल स्वरूपातील व्याख्याने (लेक्चर) उपलब्ध आहेत. तिसऱ्या विभागात संदर्भ साधने आहेत. चौथ्या विभागात स्वयं-मूल्यांकनासाठी प्रश्नावली व स्वाध्याय आहेत. विज्ञान व तंत्रज्ञान, व्यवस्थापन व व्यावसायिक, सामाजिक शास्त्रे आणि कला व संस्कृती या चार मुख्य विषयांतील ६६ उपविषयांच्या ७४० पेपरची व्याख्याने या अंतर्गत उपलब्ध आहेत. बी.एस्सी., बी.ए., बी.कॉम.च्या विद्यार्थ्यांसाठी ती उपयुक्त ठरणार आहेत.

जनसंपर्क कक्ष
28 OCT 2021 तरूण भारत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# घटनाकारांवरील महाकाव्यग्रंथांचे प्रकाशन

## कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते विद्यापीठात कार्यक्रम

प्रतिनिधी
कोल्हापूर

तरोडा–खुर्द (जि. नांदेड) येथील प्रा. अशोककुमार दवणे यांनी संपादित केलेल्या 'महामानव' या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याविषयीच्या २०२१ कवितांचा समावेश असलेल्या महाकाव्यग्रंथाचे महाराष्ट्रातील ३६ जिल्ह्यांमध्ये एकाच वेळी प्रकाशन झाले. कोल्हापुरातील प्रकाशन सोहळा कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या हस्ते शिवाजी विद्यापीठात झाला.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, महाकाव्यात तीन पिढ्यांतील कवींच्या कविता आहेत. यामध्ये विद्यापीठ कार्यक्षेत्रातील साठहून अधिक कवींच्या कवितां असणे, ही बाब महत्त्वाची आहे. यातील प्रत्येक कवीच्या कवितेमधून आंबेडकरांप्रती कृतज्ञताभाव आहे. या महाकाव्यग्रंथाचे वाचक मनापासून स्वागत करतील, असा विश्वास कुलगुरू डॉ. शिर्के यांनी व्यक्त केला.

विद्यापीठातील डॉ. आंबेडकर संशोधन, विकास केंद्राचे संचालक डॉ. एस. एस. महाजन यांनी प्रास्ताविक केले. डॉ. ज्ञानराजा चिघळीकर यांनी आभार मानले. यावेळी प्र–कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, जनसंपर्क अधिकारी डॉ. आलोक जत्राटकर, ज्येष्ठ कार्यकर्ते नामदेव कांबळे, प्रा. जेलीत कांबळे, प्रा. प्रेरणा व्यवहारे, डॉ. मधुकर धुतूरे, गौतम वर्धन, संजय कुर्डूकर, पी. डी. सरदेसाई, प्रमोद जवळगेकर आदी उपस्थित होते.

तरूण भारत

# डॉ. भारती पाटील यांची राज्य समितीवर निवड

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील राज्यशास्त्र अधिविभागातील सहाय्यक प्राध्यापक डॉ. भारती पाटील यांची महाराष्ट्र राज्य महाराजा



सयाजीराव गायकवाड चरित्र साधन प्रकाशन समितीच्या सदस्यपदी निवड झाली आहे. डॉ. पाटील ३१ वर्षापासून विद्यापीठातील राज्यशास्त्र विभागात सहयोगी प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत. त्या शारदाबाई पवार अध्यासन केंद्र, महात्मा गांधी अध्यासन केंद्र, दत्ता देशमुख अध्यासन केंद्राच्या समन्वयक आहेत. विद्यापीठाच्या अधिष्ठाता, व्यवस्थापन परिषद, विद्या परिषद आणि सिनेट सदस्य म्हणून कार्यरत आहेत. शासनाने महाराष्ट्र राज्य महाराजा सयाजीराव गायकवाड चरित्र साधन प्रकाशन समितीच्या सदस्यपदी त्यांची निवड केली आहे.

तरुण भारत

# 'सीईसी'च्या शैक्षणिक सुविधा पदवीस्तरावर उपलब्ध

**कोल्हापूर :** विद्यापीठ अनुदान आयोगाच्या (युजीसी) 'कन्सॉर्शियम ऑफ एज्युकेशनल कम्युनिकेशन' (सीईसी) या उपक्रमांतर्गत विविध ऑनलाईन शैक्षणिक सुविधा शिवाजी विद्यापीठाच्या पदवी स्तरांवरील विद्यार्थ्यांसाठीही उपलब्ध करण्यात आल्या आहेत. त्यांचा महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा, असे आवाहन विद्यापीठाच्या बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्राच्या संचालक डॉ. नमिता खोत यांनी केले आहे. शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के यांच्या हस्ते या उपक्रमाचे नुकतेच ऑनलाईन लोकार्पण करण्यात आले आहे. दूरदर्शनचे प्रभावी माध्यम असून, नवसाधनांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या उच्चशैक्षणिक गरजांची पूर्तता करण्यासाठी ते विकसित केले आहे. 'सीईसी''ने तयार केलेल्या पदवी स्तरावरील अभ्यासक्रमांसाठीचे स्टडी मटेरियल तसेच ई-कन्टेन्ट विद्यार्थ्यांना मिळण्यासाठी विद्यापीठाने त्यांच्यासमवेत सामंजस्य करार केला आहे. या कराराअंतर्गत 'सीईसी''चे स्टडी मटेरियल **e-contents for Under Graduate Studen** या वेबपेजवर 'सीईसी''च्या **http://cen.in/cec/curriculum_class** या लिंकवरील ई-कन्टेन्ट व्हिडिओसह उपलब्ध केले आहेत.

- **महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा: डॉ. नमिता खोत यांचे आवाहन**

### उपलब्ध अभ्यासक्रम...

मॉड्यूलमध्ये चार विभाग (क्वाड्रंट) आहेत. त्यापैकी पहिल्या विभागात लिखित (टेक्स्ट) स्वरुपातील संसाधने आहेत. दुसऱ्या विभागात ऑडिओ-व्हिज्युअल स्वरुपातील व्याख्याने (लेक्चर) उपलब्ध आहेत. तिसऱ्या विभागात संदर्भ साधने आहेत. चौथ्या विभागात स्वयं-मूल्यांकनासाठी प्रश्नावली व स्वाध्याय समाविष्ट आहेत. विज्ञान व तंत्रज्ञान, व्यवस्थापन व व्यावसायिक, सामाजिक शास्त्रे आणि कला व संस्कृती या चार मुख्य विषयांमधील ६६ उपविषयांचे ७४० पेपरची व्याख्याने याअंतर्गत उपलब्ध करण्यात आली आहेत. बी. एस्सी., बी. ए. आणि बी. कॉम.च्या विद्यार्थ्यांसाठी ती उपयुक्त ठरणार आहेत.

तरुण भारत

# एम. फिल., पीएच. डी. प्रवेश परीक्षा सुरळीत

- १२०५ विद्यार्थ्यांनी दिली परीक्षा तर ६९९ अनुपस्थिती

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ अंतर्गत विविधं ४५ विषयांची एम. फिल., पीएच. डी.ची प्रवेश परीक्षा तीन सत्रात सुरू आहे. बुधवारी १९०४ विद्यार्थ्यांपैकी १२०५ विद्यार्थ्यांनी ही परीक्षा दिली. तर ६९९ विद्यार्थी अनुपस्थित होते, अशी माहिती शिवाजी विद्यापीठ परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे



संचालक गजानन पळसे यांनी दिली. कोल्हापूर जिल्ह्यासाठी शहाजी कॉलेज, सांगली जिल्ह्यासाठी श्रीमती मथुबाई गरवारे कन्या महाविद्यालय, सातारा जिल्ह्यासाठी यशवंतराव चव्हाण इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स या महाविद्यालयांमध्ये ऑफलाईनने ओएमआरसीटवर ही परीक्षा झाली. यामध्ये इलेक्ट्रॉनिक्स, बिझनेस मॅनेजमेंट, मराठी, इलेक्ट्रॉनिक्स ॲन्ड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंग, इन्व्हॉरमेंटल सायन्स, कॉम्प्युटर सायन्स, गणित, रशियन भाषा, भूगोल, मायक्रो बायोलॉजी, संख्याशास्त्र, मेकॅनिकल इंजिनिअरिंग, मानसशास्त्र, अर्थशास्त्र, प्राणीशास्त्र, ॲग्रो केमिकल ॲन्ड पेस्ट मॅनेजमेंट या विषयांचा समावेश आहे.

पुढारी

# विद्यापीठ परीक्षांचे निकाल जाहीर

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठ ऑनलाईन परीक्षांचे निकाल जाहीर करण्यात आले. बी.एसस्सी., एम.एसस्सी., नॅनो सायन्स, एम.एस.डब्ल्यू. आदी परीक्षांचा यात समावेश आहे.

एम.एस.डब्ल्यू. सेमीस्टर १ व २, एम.टेक. सेमी १ व २, अशा एकूण ८ परीक्षांचे निकाल जाहीर झाले. आजपर्यंत एकूण ५२७ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर करण्यात आले आहेत. तसेच विविध अभ्यासक्रमांसाठी एम.फिल. व पीएच.डी. प्रवेश प्रक्रिया घेण्यात आली. १९२३ विद्यार्थ्यपैकी १२४५ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिल्या. या परीक्षांबाबत काही त्रुटी असल्यास विद्यार्थ्यांनी दि. २९ रोजी सायंकाळी सहापर्यंत विद्यापीठाच्या ई-मेलवर तक्रारी नोंदवण्याचे आवाहन करण्यात आले आहे.